# सायबर सुरक्षा अभियानमध्ये शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड

प्रतिनिधी २० जून



**अकोला:** येथील शंकरलाल खंडेलवाल आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज अकोला येथील बी.सी.ए व बी.एस.स्सी (कंप्युटर सायन्स) विभागातील चार विद्यार्थ्यांनी क्विक हिल फाउंडेशन, विमाननगर, पुणे येथे आयोजित 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या विशेष प्रशिक्षण सत्रात यशस्वी सहभाग नोंदविला. सायबर सुरक्षा विषयक जनजागृती आणि प्रशिक्षण हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. याकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक डॉ. दीप्ती पेटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अभियानासाठी कॉलेजच्या सायबर कुब ऑफिसर्स म्हणून प्रेसिडेंट रोहन सर्जेकर, सेक्रेटरी प्रणाली पिंपळकर, कम्युनिटी डायरेक्टर पूर्वा ताथे, डायरेक्टर पी.आर. मीडिया व अनिकेत फुके यांची निवड करण्यात आली. या प्रशिक्षणात क्विक हिल फाउंडेशनचे प्रमुख मार्गदर्शक अजय शिर्के व गायत्री केसकर यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, ऑनलाइन फ्रॉड, सोशल मीडियातील धोके, पासवर्ड मॅनेजमेंट आणि डेटा प्रोटेक्शन यांसारख्या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. क्विक हिल कंपनीच्या चेअरपर्सन अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांशी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'तरुण पिढी जर सजग झाली, तर सायबर गुन्ह्यांना अटकाव करण्याची मोठी संधी निर्माण होईल.' या प्रशिक्षणाचा उद्देश नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता वाढवणे, विविध सामाजिक घटकांना डिजिटल साक्षर बनवणे आणि सायबर अवेअर शहर निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी या मोहिमेच्या पुढील टप्प्यात शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत, महापालिका आणि विविध संस्थांमध्ये जनजागृती अभियान राबविण्याचा संकल्प केला आहे.